| CNR NO.MHPU100001612025 | | | |
|---|---|---|---|
| | दाखल दिनांक | :- | १६/०७/२०२१ |
| | नोंदणी दिनांक | :- | १६/०७/२०२१ |
| | निकाल दिनांक | :- | १७/०८/२०२६ |
| | कालावधी | :- | ०५व. ०१म. ०१दि. |

## भाग–अ

**(फौजदारी नियम पुस्तिका प्रकरण क्र.६, परिच्छेद क्रमांक ४४ (i))**

| | | |
|---|---|---|
| | **विद्यमान न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, पिंपरी चिंचवड मनपा न्यायालय, आकुर्डी, पुणे.**<br>**(पीठासीन न्यायाधीश: श्री. विनोद संतोष डामरे)**<br>**(पारीत दि.१७/०८/२०२६)**<br><br>**नियमित फौ.ख.क्र. ०२/२०२५ नि.क्र.२२**<br>**जुना संक्षिप्त फौ.ख.क्र.११७/२०२१** | |
| | प्रथम खबर अहवाल दि.१५/१२/२०२०, तक्रारदाराचे नावः श्री. नरेश रामकिसन रोहीला<br>गुन्हा र. नंबर – ४७९/२०२० पोलीस स्टेशन निगडी | |
| **अभियोगपक्ष** | | **महाराष्ट्र सरकार,**<br>पोलिस निरीक्षक,<br>निगडी पोलीस ठाणे, पुणे. |
| **अभियोक्ता** | | श्री. व्ही. एस. घुमटकर – सहा. सरकारी अभियोक्ता |
| **आरोपी** | | **श्री.इंद्रजित गंगाधर कुलकर्णी,**<br>वय – ५९ वर्षे, धंदा – निरंक,<br>रा. संभाजी नगर आकाश बिल्डींगसमोर, आकुर्डी–३५. |
| **आरोपीतर्फे अधिवक्ता** | | श्रीमती पाटील. |

## भाग ब

**(फौजदारी नियम पुस्तिका प्रकरण क्र.६, परिच्छेद क्रमांक ४४** (ii))

| | |
|---|---|
| अपराध घडल्याचा दिनांक – | १३/०१/२०२० |
| प्रथम खबर अहवाल दिनांक – | १५/१२/२०२० |
| दोषारोपपत्र दाखल दिनांक – | १६/०७/२०२१ |
| दोषारोप निश्चित केल्याचा दिनांक – | १८/११/२०२५ |
| पुरावा सुरु झाल्याचा दिनांक – | २४/०२/२०२६ |
| न्यायनिर्णय राखून ठेवल्याचा दिनांक – | – |
| न्यायनिर्णय पारीत दिनांक – | १७/०८/२०२६ |
| शिक्षा सुनावली असल्यास दिनांक– | निरंक |

## :: आरोपीचा तपशील ::

| आ. क्र. | आरोपीचे नाव | अटक दि. | जामिन वर मुक्त केल्याचा दि. | दोषारोप | निर्दोष / शिक्षा | शिक्षा | फौ.प्र.सं.क. ४२८ साठी आरोपी कैदेत असल्याचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | **श्री. इंद्रजित गंगाधर कुलकर्णी** | १६/०७/२०२१. | १६/०७/२०२१. | महाराष्ट्र प्रादेशीक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ५२, ५३ व महा. महानगर | निर्दोष | – | – |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | पालिकेचे कलम, ३९७ अ (१), ब प्रमाणे | | | |

## <u>भाग क</u>

**(फौजदारी नियम पुस्तिका प्रकरण क्र.६, परिच्छेद क्रमांक ४४ (iii))**

**अभियोग पक्ष/बचाव पक्ष/न्यायालयातर्फे तपासण्यात आलेल्या साक्षीदारांची यादी**

**अ. अभियोग पक्षातर्फे तपासण्यात आलेल्या साक्षीदारांची यादी.**

| क्रमांक | साक्षीदाराचे नाव | पुराव्याचे/साक्षीदाराचे स्वरुप |
|---|---|---|
| १ | श्री. नरेश रामकिसन रोहिला | फिर्यादी |
| २ | श्री. तानाजी ज्ञानदेव ढेकळे | घटनास्थळ पंच |
| ३ | श्री. चंद्रकांत सर्जेराव भोसले | तपासी अंमलदार |

**ब. बचाव पक्षातर्फे तपासण्यात आलेल्या साक्षीदारांची यादी – निरंक.**

**क. न्यायालयातर्फे तपासण्यात आलेल्या साक्षीदारांची यादी – निरंक.**

**अभियोग पक्ष/बचाव पक्ष /न्यायालयामार्फत दस्तऐवजास देण्यात आलेल्या निशाणीः–**

**अ. अभियोग पक्षः–**

| क्रमांक | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १ | १४/स.सा.क्र.१ | घटनास्थळ पंचनामा |
| २ | १५/स.सा.क्र.१ | नोटीस |
| ३ | १६/स.सा.क्र.१ | तक्रार अर्ज |
| ४ | आर्टिकल अ/स.सा.क्र.१ | छायाचित्र |

| | | |
|---|---|---|
| ५ | १९/स.सा.क्र.३ | अटक मेमो |
| ६ | २०/स.सा.क्र.३ | अंगझडती पंचनामा |

**ब. बचाव पक्षः– निरंक**.

**क. न्यायालयामार्फत देण्यात आलेल्या निशाणीः– निरंक**.

**ड. मुद्देमाल – निरंक**.

====================================

**दोषारोपः– महाराष्ट्र प्रादेशीक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ५२,५३ व महाराष्ट्र महानगरपालिकेचे कलम ३९७, अ (१) (ब) प्रमाणे**.

====================================

# :: न्या य नि र्ण य ::

## (पारीत दि.१७/०८/२०२६)

सदर खटला आरोपीविरुध्द महाराष्ट्र प्रादेशीक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ५२, ५३ व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम २०१२ चे कलम ३९७ अ (१)(ब) च्या दंडनीय अपराधाकरीता चालविण्यात आला.

**अभियोग पक्षाचे थोडक्यात कथन पुढील प्रमाणेः**

**२.** दि.१३/०१/२०२० रोजी स.नं. १७९, पैकी संभाजी नगर, आकाश बिल्डींगसमोर, आकुर्डी, पुणे येथे आरोपीने पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची पुर्व परवानगी न घेता तळ मजल्याचे वीट बांधकाम विना परवाना केल्याचे फिर्यादी यांच्या निदर्शनास आले. फिर्यादी यांनी सदर अनधिकृत बांधकामाचा पंचनामा केला. त्यानंतर आरोपीस सदर बांधकाम काढुन घेण्याकरीता दि.१४/०१/२०२० रोजी नोटीस देण्यात आली. परंतु, आरोपीने नोटीस देऊनही अनधिकृत बांधकाम काढुन घेतले नाही, त्यामुळे आरोपीविरुध्द फिर्यादीने पोलीस स्टेशनला फिर्याद दिली.

**३.** सदर फिर्यादीच्या अनुषंगाने गुन्हा क्र.४७९/२०२० आरोपीविरुध्द नोंदविण्यात आला. तपासी अधिकारी सी. ए. भोसले, पोलीस हवालदार, निगडी पोलीस

स्टेशन यांनी तपासादरम्यान घटनास्थळाला भेट दिली, साक्षीदारांकडे चौकशी करुन त्यांची तपास टिपणे नोंदविली व आरोपीविरुध्द न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले.

**४.** महाराष्ट्र प्रादेशीक नगररचना अधिनियमचे कलम ५२, ५३ महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम २०१२ चे कलम ३९७ अ (१)(ब) अन्वये दोषारोप (नि.क्र.१२) ठेवले. त्यातील मजकुर त्यास त्याच्या भाषेत वाचुन व समजावून सांगितला असता त्याने जबानी (नि.क्र.११) नुसार गुन्हा नाकबुल असल्याचे सांगितले. त्यामुळे खटला पुढे चालविण्यात आला.

**५.** अभियोग पक्षातर्फे एकुण तीन साक्षीदार तपासण्यात आले. आरोपीविरुध्द गुन्हादर्शक पुरावा समोर आल्याने आरोपीचा फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ (१)(ब) नुसार (नि.क्र.२१) जबाब नोंदविण्यात आला. आरोपीने त्याच्याविरुध्द खोटी केस केल्याचे सांगितले. त्याने त्याच्या बचावाच्या समर्थनार्थ कोणताही पुरावा सादर केला नाही.

**६.** अभियोग पक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. व्ही. एस. घुमटकर व आरोपीतर्फे अधिवक्ता श्रीमती पाटील यांचा युक्तीवाद ऐकण्यात आला. अभियोग पक्षाचा पुरावा व युक्तीवाद पाहता खालीलप्रमाणे मुद्दे उपस्थित झाले. त्यावर मी कारणमिमांसेसह निष्कर्ष खालीलप्रमाणे दिलेले आहेत.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | आरोपीने दि.१३/०१/२०२० रोजी स. नं. १७९, पैकी संभाजी नगर, आकाश बिल्डींगसमोर, आकुर्डी, पुणे ३५ येथे पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची पुर्व परवानगी न घेता तळ मजल्याचे वीट बांधकाम विना परवाना केल्याचे अभियोग पक्षाने शाबित केले काय? | ....नकारार्थी |
| २. | वरील तारीख व ठिकाणी आरोपींनी विना परवाना केलेले अनधिकृत बांधकाम काढुन टाकण्याकरीता नोटीस | |

| | | |
|---|---|---|
| | मिळाल्यानंतरही त्यांनी नोटीसीची पुर्तता केली नाही, असे अभियोग पक्षाने शाबित केले काय ? | ....नकारार्थी |
| ३. | वरील तारीख व ठिकाणी आरोपींनी विनापरवाना केलेले अनधिकृत बांधकाम काढुन टाकण्याकरीता नोटीस मिळाल्यानंतरही अनधिकृत बांधकाम चालू ठेवले, असे अभियोग पक्षाने शाबित केले काय ? | ....नकारार्थी |
| ४. | आदेश काय ? | आरोपीस निर्दोष मुक्त करण्यात आले. |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्र.१ ते ३ करीताः–**

**७.** मुद्दे क्र.१ ते ३ एकमेकांशी सलंग्न असुन त्यासंबंधी गुन्हयाचे घटक व त्यांचा पुरावा समान आहे. त्यामुळे विषयाची आणि पुराव्याची पुनरावृत्ती टाळण्यासाठी मी सदर मुद्दे एकत्ररित्या चर्चेकरिता घेत आहे.

**८.** आरोपीविरुध्दचा आरोप शाबित करण्याकरीता अभियोग पक्षातर्फे एकुण तीन साक्षीदारांची साक्ष नोंदविण्यात आली. साक्षीदार क्र.१ श्री. नरेश रामकिसन रोहिला, फिर्यादी (नि.क्र.१३), साक्षीदार क्र.२ श्री. तानाजी ज्ञानदेव ढेकळे, पंच साक्षीदार (नि.क्र.१७) व साक्षीदार क्र.३ श्री. चंद्रकांत सर्जेराव भोसले, तपासी अंमलदार (नि.क्र.१८) वर तपासले. उर्वरीत साक्षीदारांपैकी कोणीही हजर झाले नाही. त्यामुळे प्राप्त परिस्थितीत प्रकरण आणखी प्रलंबित ठेवून काहीही निष्पन्न होणार नाही असे निदर्शनास आल्याने अभियोग पक्षाचा पुरावा बंद करण्यात आला. बचाव पक्षाच्यावतीने कोणाचीही साक्ष नोंदविण्यात आली नाही.

**९.** आरोपीविरुध्दचा आरोप शाबित करणेसाठी, आरोपीने दि.१३/०१/२०२० रोजी स.नं. १७९, पैकी संभाजी नगर, आकाश बिल्डींगसमोर, आकुर्डी, पुणे येथे पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची पुर्व परवानगी न घेता तळ मजल्याचे

वीट बांधकाम विना परवाना केले. सदर अनधिकृत बांधकाम काढुन टाकण्यासाठी नोटीस देण्यात आली. परंतु, आरोपीने नोटीसीचे पालन केले नाही तसेच नोटीस मिळुनही बांधकाम चालु ठेवले याबाबी अभियोग पक्षाने शाबित करणे गरजेचे आहे.

**१०.** फिर्यादी नरेश (स.सा.क्र.१) यांनी त्यांच्या साक्षीत असे कथन केले आहे की, दि.१३/०१/२०२० रोजी आरोपीने अनधिकृत बांधकाम पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची पुर्व परवानगी न घेता सुरु असल्याचे आढळुन आले. त्यानंतर पंचनामा (नि.क्र.१४) केला व आरोपीला नोटीस (नि.क्र.१५) दिली. तरीही आरोपीने बांधकाम काढले नाही म्हणुन त्यांनी आरोपीविरुध्द दि.१५/१२/२०२० रोजी पोलिस ठाण्यात तक्रारी अर्ज (नि.क्र.१६) दिला.

**११.** फिर्यादीच्या कथनाला दुजोरा मिळण्याकरीता अभियोग पक्षातर्फे तानाजी (स.सा. क्र.२) यांची साक्ष नोंदविण्यात आली. त्यांनी त्यांच्या साक्षीत असे कथन केले आहे की, त्यांनी आरोपीस नोटीस दिली. पंचनामा (नि.क्र.१४) करतेवेळी ते हजर होते व त्यावर त्यांची सही आहे. तसेच त्यांनी आरोपीच्या मिळकतीची छायाचित्रे (आर्टिकल अ) घेतले. अभियोग पक्षातर्फे चंद्रकांत (स.सा. क्र.३) यांची साक्ष नोंदविण्यात आली. त्यांनी त्यांच्या साक्षीत असे कथन केले आहे की, ते दिनांक १५/०५/२०२० रोजी निगडी पोलीस स्टेशन येथे ठाणे अंमलदार या पदावर कार्यरत होते. गु. र. क्र. ४७९/२०२० चा तपास वरिष्ठांनी त्यांच्याकडे दिला. त्यांनी कागद पत्रांची शहानिशा केली, साक्षीदारांचे तपासटिपण नोंदवले, आरोपीला अटक करुन अटक मेमो (नि.क्र.१९) व अंगझडती पंचनामा (नि.क्र.२०) केला. तपास पुर्ण केल्यानंतर न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले. साक्षीदार क्र.१ ते ३ यांनी त्यांच्या उलटतपासात त्यांना सदर मिळकतीचा गट क्रमांक, सीटीएस क्रमांक, सिटी सर्वे क्रमांक सांगता येत नसल्याचे सांगितले आहे. साक्षीदार क्र.१ ते ३ यांनी त्यांच्या उलटतपासात सदर अनधिकृत बांधकामाच्या संदर्भात तेथील मजूर, आजूबाजूच्या लोकांचे, ठेकेदार, स्थानिक अथवा लगतचे रहिवाशांचे जाबजबाब नोंदविले नसल्याचे सांगितले आहे. तसेच साक्षीदार क्र.३ यांनी त्यांच्या उलटपासात प्रकरणाबाबत काहीही माहित नसल्याचे सांगितले आहे.

**१२.** अभियोग पक्षातर्फे तपासण्यात आलेल्या साक्षीदारांच्या साक्षीचे अवलोकन केले असता महानगरपालिकेच्या अधिका–यांना असे निदर्शनास आले की, आरोपीने दि.१३/०१/२०२० रोजी स.नं. १७९, पैकी संभाजी नगर, आकाश बिल्डींगसमोर, आकुर्डी, पुणे येथे पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची पुर्व परवानगी न घेता तळ मजल्याचे वीट बांधकाम विना परवाना केले. त्यानुसार त्यांनी कार्यवाही केली. पंचनामा (नि.क्र.१४) चे अवलोकन केले असता सदर पंचनाम्यामध्ये आरोपीचे नाव, त्याच्या बांधकामाचे क्षेत्रफळ व चतुःसिमा नमुद केलेल्या आहेत. तसेच आरोपीने केलेले अनधिकृत बांधकाम काढुन घेण्यासाठी त्यास पाठविलेल्या नोटीसीनुसार शाबित झाले असले तरी नोटीस व पंचनाम्यामध्ये नमुद केलेल्या अनधिकृत बांधकाम केलेल्या मिळकतीच्या मालकीबाबतचा कोणताही मुळ कागदोपत्री पुरावा याकामी दाखल केला नाही. याशिवाय कोणताही स्वतंत्र साक्षीदार प्रकरणात उपलब्ध नाही. त्यामुळे सदरची मिळकत ही आरोपीच्याच मालकीची आहे व त्या मिळकतीमध्ये आरोपीने विनापरवाना अनधिकृत बांधकाम केले ही बाब शाबित करण्यास अभियोग पक्ष असमर्थ ठरले आहेत. तसेच चंद्रकांत (स.सा. क्र.३) यांनी प्रकरणात तपासी अधिकारी असुन सुध्दा घटनास्थळ पंचनामा केला नाही. घटनेचा दिनांक व फिर्यादचा दिनांक यामध्ये खुप दिवसाचे अंतर दिसुन येते. फिर्याद दाखल करण्यास का उशीर झाला त्याचे स्पष्टीकरण फिर्यादीत अथवा फिर्यादीचे पुराव्यात आलेले नाही. तसेच सर्व साक्षीदार हे एकाच कार्यालयाशी संबंधीत आहेत. स्थानिक पंच अथवा लगतचे शेजारी यांची साक्ष प्रकरणात उपलब्ध नाहीत.

**१३.** अभियोग पक्षाच्या तीनही साक्षीदारांनी त्यांनी केलेल्या कार्यवाहीच्या अनुषंगाने साक्ष दिलेली असली तरी फिर्यादी नरेश (स.सा. क्र.१) यांना अनधिकृत बांधकाम/ अतिक्रमण निर्मुलन संदर्भात फिर्याद देण्याचे अधिकार होते त्याबाबतचे अधिकारपत्र प्रकरणात सिध्द झालेले नाही. तसेच सबळ पुराव्याअभावी त्यांची साक्ष ही आरोपीने त्याच्या मालकीच्या मिळकतीवर विना परवानगी अनधिकृत बांधकाम केल्याबाबतचा आरोप वाजवी संशयाच्या पलिकडे शाबित होण्याइतपत पुरावा प्रकरणात उपलब्ध नाही. प्रकरणात केलेला गुन्हा हा आरोपीनेच केलेला आहे हे सिध्द करण्याची जबाबदारी अभियोग पक्षावर असते. त्यांना आरोपीच्या उणीवांचा लाभ घेता येत नाही.

**१४.** सबब, अभियोग पक्षाच्यावतीने दिलेल्या पुराव्याचे अवलोकन केले असता हे स्पष्ट होते की, सदर पुरावा हा आरोपीविरुध्दचा गुन्हा सिध्द करण्यासाठी पुरेसा नाही. सबब, अशा परिस्थितीत आरोपी हे निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहे. करीता, मी मुद्दा क्र.१ ते ३ चे निष्कर्ष नकारार्थी देत आहे.

**मुद्दा क्र.४ करिता.**

**१५.** मुद्दा क्र.१ ते ३ वरील नकारार्थी निष्कर्षावरुन मुद्दा क्र.४ करिता खालील आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

| | |
|---|---|
| १. | आरोपी **श्री. इंद्रजित गंगाधर कुलकर्णी** यांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम २०१२ चे कलम ३९७ अ (१)(ब) व महाराष्ट्र प्रादेशीक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ५२, ५३ च्या दंडनीय अपराधातुन फौजदारी प्रक्रीया संहीता कलम २४८ (१) अन्वये निर्दोष मुक्त करण्यात येत आहे. |
| २. | आरोपीचे जामीनकदबे व बंधपत्र रद्द करण्यात येत आहे. |
| ३. | फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम ४३७ (अ) च्या अनुपालनाकरीता आरोपीचे पुढील सहा महिन्याकरीता रक्कम रुपये १५,०००/- (पंधरा हजार रुपये) चे बंधपत्र जमानतदारासह दयावे. |

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत करण्यात आला.)

सही/-

दिनांक : १७/०८/२०२६

(व्ही. एस. डामरे)
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग,
(पिं.चिं.म.न.पा.), आकुर्डी, पुणे.

**CERTIFICATE**

“I affirm that the contents of this P.D.F. file Judgment are same word for word as per original Judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | Gaurav A. Bobade (Grade III) |
| Court Name | :- | Shri. V. S. Damare,<br>(J.M.F.C.)<br>Civil and Criminal Court (P.C.M.C.), Akurdi, Pune. |
| Date | :- | 17/08/2026 |
| Judgment signed by presiding officer on | :- | 17/08/2026 |
| Judgment uploaded on | :- | 17/08/2026 |